जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 FEB 2025
तरुण भारत

# विद्यापीठात संत रविदास महाराजांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात संत रविदास महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेस प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे डॉ. अण्णासाहेब गुरव, डॉ. दीपा इंगवले, डॉ. तेजपाल मोहरेकर, उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव आदी उपस्थित होते.

13 FEB 2025 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उद्यापासून 'शिक्षण, उद्योग, शासन परिषद'

## प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील; नवोपक्रम अन् स्टार्टअपवर तज्ज्ञ करणार मार्गदर्शन

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठामधील नवोपक्रम, नवसंशोधन व सहचर्य केंद्र, एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाउंडेशनतर्फे शुक्रवारी (ता. १४) आणि शनिवारी (ता. १५) 'शिक्षण, उद्योग आणि शासन परिषद १.०' विद्यापीठात होणार आहे. 'विकसित भारत २०४७ साठी नवोपक्रम आणि स्टार्टअप्स' असा या परिषदेचा विषय आहे. त्यात देशभरातील विविध विद्यापीठे, उद्योग व शासनाच्या संलग्नित विभागातील मान्यवर मंडळी सहभागी होणार असल्याची माहिती प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली.



समाजातील सर्व घटकांना उद्योगक्षम, उद्योगशील बनविण्याच्या उद्देशाने आयोजित या शिक्षण, उद्योग आणि शासन परिषदेचे उद्घाटन शुक्रवारी सकाळी दहा वाजता विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात आय. आय. टी. कानपूरचे माजी संचालक डॉ. संजय धांडे यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर उद्योजक आनंद देशपांडे, ऋषिकेश धांडे, रामदास माने, डॉ. राजेश कुमार आडला, नरसिंह नायक पेरमपल्ली मार्गदर्शन करणार आहेत. परिषदेत शनिवारी बारामती ॲग्रो ट्रस्टचे तज्ज्ञ डॉ. संतोष कारंजे हे 'कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी डॉ. पी. पी. वडगावकर, सी. व्ही. रोडे, जमीर करीम, अनमोल कोरे, संजय पेंडसे, बी. एस. शिंपुगडे मार्गदर्शन करणार आहेत. महिला उद्योजिकांसाठीच्या विशेष चर्चासत्रात डॉ. ज्योती जाधव, सुजाता कणसे, शर्मिली माने, अनुराधा भोसले, तनुजा शिपूरकर, सुप्रिया ढपाळे-पोवार सहभागी होणार आहेत. त्यानंतर उद्योजिका विनया गोरे, डॉ. सौरभ सोनी मार्गदर्शन करणार असल्याचे प्र-कुलगुरू डॉ. पाटील आणि 'नवोपक्रम केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांनी सांगितले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, एसयूके-आरडीएफचे सीईओ डॉ. प्रकाश राऊत, परिषदेचे समन्वयक सुभाष माने उपस्थित होते.

### विद्यार्थी सादर करणार विविध प्रकल्प

■ गुरुवारी (ता. १३) जिल्ह्यातील १३० अटल टिंकरिंग लॅब असलेल्या शाळांतील विद्यार्थी एकूण १७५ प्रकल्प सादर करणार आहेत. त्यातील निवडक बारा प्रकल्प या परिषदेत मांडले जाणार आहेत. विविध कंपन्या, नवसंशोधक, स्टार्टअप्सचे प्रदर्शन राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात भरविण्यात येणार असल्याचे डॉ. राऊत यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 FEB 2025
लोकमत

# शिक्षण उद्योग, शासन परिषद उद्यापासून

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठामधील नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्र आणि एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाउंडेशनतर्फे उद्या, शुक्रवारी आणि शनिवारी 'शिक्षण, उद्योग आणि शासन परिषद १.०' होत आहे. 'विकसित भारत २०४७ साठी नवोपक्रम आणि स्टार्टअप्स' असा परिषदेचा विषय आहे. यामध्ये देशभरातील विविध विद्यापीठे, उद्योग, शासनाच्या संलग्नित विभागातील मान्यवर मंडळी सहभागी होत असल्याची माहिती प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. पाटील म्हणाले की, गुरुवारी शिवाजी विद्यापीठ, जिल्हा परिषद आणि लेंड अ हॅन्ड इंडिया पुणेतर्फे १३० अटल टिंकरिंग स्कूल्सकडून १७५ प्रकल्पांचे सादरीकरण होईल. त्यात ५००हून अधिक शिक्षक, विद्यार्थी सहभागी होतील. १४ फेब्रुवारीला परिषदेचे उद्घाटन उज्जैन (मध्य प्रदेश)च्या अवंतिका विद्यापीठाचे कुलगुरू आय.आय.टी. कानपूरचे माजी संचालक आणि पद्मश्री पुरस्कारप्राप्त प्रा. डॉ. संजय धांडे यांच्या हस्ते होणार आहे. पत्रकार परिषदेला एसयूके-आरडीएफचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रकाश राऊत, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर, समन्वयक सुभाष माने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 FEB 2025

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात उद्या नवोपक्रम परिषदेचे उद्घाटन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामधील नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्र व एसयूके रिसर्च अँण्ड डेव्हलपमेंट फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने १४ ते १५ फेब्रुवारी या कालावधीमध्ये 'शिक्षण, उद्योग आणि शासन परिषद १.०' होणार आहे. ही परिषद 'विकसित भारत २०४७ साठी नवोपक्रम आणि स्टार्टअप्स' या विषयावर होत आहे. शुक्रवार १४ रोजी ११ वाजता आयआयटी कानपूरचे माजी संचालक कुलगुरू पद्मश्री डॉ. संजय धांडे यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे, अशी माहिती प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली आहे.

प्र-कुलगुरू पाटील म्हणाले, १४ फेब्रुवारी या परिषदेत शैक्षणिक संस्थांमधून सरदार वल्लभाई पटेल विद्यापीठ, (गुजरात), होमी भाभा विज्ञान विद्यापीठ, मुंबई (महाराष्ट्र), कौशल्य विकास विद्यापीठ, मुंबई (महाराष्ट्र), इंडो-जर्मन टूल रुम, औरंगाबाद (महाराष्ट्र), डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र), संजय घोडावत अभिमत विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र), औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर (महाराष्ट्र) या संस्थाचे तज्ज्ञ सहभागी हातील. तसेच संस्थांचे उद्योग प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. शनिवार १५ फेब्रुवारी रोजी बारामती अॅग्रो ट्रस्टचे तज्ञ डॉ. संतोष कारंजे 'कृषि क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर" यावर मार्गदर्शन करतील. महिला उद्योजिकांसाठी डॉ. ज्योती जाधव, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या सुजाता कणसे, कोल्हापूरातील महिला स्टार्टअप उद्योजिका व प्युअरमी संस्थेच्या संस्थापिका शर्मिली माने, अवनीच्या अनुराधा भोसले, आदी मार्गदर्शन करतील. अमेरिकेतील गोरे उद्योग समूहाच्या संस्थापिक विनया गोरे आणि डॉ. सौरभ सोनी मार्गदर्शन करतील.

आज १३ रोजी १७५ प्रकल्पांचे सादरीकरण होणार असून ५०० हून अधिक शिक्षक,विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 FEB 2025
Times of India

# Conclave be held in SUK on Feb 14, 15

**Kolhapur**: In collaboration with the Center for Innovation, Incubation and Linkages (SCIIL) and the SUK Research and Development Foundation from Shivaji University, a two-day 'Academia-Industry-Govt Conclave 1.0' has been organised at SUK on Feb 14 and 15.

The conclave is being held on the theme of 'Innovations and Startups for a Vikasit Bharat -2047'.

Dignitaries from universities, researchers, and affiliated departments of the govt will participate in this event, informed SUK pro-vice chancellor Dr Pramod Patil.

Patil said, "In this conclave, the concept of startups, self-employment and job creation, financial assistance from the govt and financial institutions, support from the govt, challenges in this sector, etc. will be presented."

Maharashtra State Innovation Development Society (MSInS), Institute of Innovation Council, Government of India (IIC), Ministry of Micro, Small and Medium Enterprises, Government of India (MSME), National Council of Vocational Education and Training (NCVET), New Delhi, and Maharashtra State Department of Skill Development and Entrepreneurship will participate along with other universities and industries from India. TNN

जनसंपर्क कक्ष
शिवाजी-विद्यापीठ, कोल्हापूर
13 FEB 2025
पुढारी



# विद्यापीठात दहा अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर नोव्हेंबर-२०२४ चा हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अशा १० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले असून आजअखेर एकूण ६५८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. तसेच परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी दिलेल्या सूचनांप्रमाणेच विद्यार्थ्यांनी परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 FEB 2025
सकाळ

# विद्यापीठात शनिवारी संख्याशास्त्र कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागातर्फे शनिवारी (ता.१५) पीएम-उषा पुरस्कृत 'वास्तविक समस्यांचे सांख्यिकीय अन्वेषण' या विषयावरील कार्यशाळा होणार आहे. कार्यशाळा तीन सत्रात होणार असून पहिल्या सत्रामध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि संख्याशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. शशिभूषण महाडिक यांची व्याख्याने होतील. दुसरे सत्र 'माझे संख्याशास्त्र, माझे जीवन' हे संवादात्मक असून, यामध्ये ज्यांनी सांख्यिकीशास्त्रात यशस्वी कारकीर्द घडवली आहे, अशा अधिविभागाच्या प्रतिष्ठित माजी विद्यार्थ्यांची प्रेरणादायी मुलाखत होईल. तिसऱ्या सत्रात सांख्यिकीशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी 'सार्वजनिक आरोग्यामधील सांख्यिकीय अंतर्दृष्टी' या विषयावर प्रकल्प सादरीकरण स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेसाठी कोल्हापूर, सांगली, सातारा आणि सोलापूर या जिल्ह्यांतील प्राथमिक फेरीमधील एकूण अकरा प्रकल्पांपैकी अंतिम फेरीसाठी पाच प्रकल्पांची निवड करण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 FEB 2025

पुण्यनगरी

# विद्यापीठात शनिवारी संख्याशास्त्र कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागातर्फे शनिवारी पीएम-उषा पुरस्कृत 'वास्तविक समस्यांचे सांख्यिकीय अन्वेषण' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केल्याची माहिती संख्याशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. शशिभूषण महाडिक यांनी दिली. कार्यशाळा तीन सत्रांत होणार आहे. पहिल्या सत्रामध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. शशिभूषण महाडिक यांची व्याख्याने होतील. दुसरे सत्र 'माझे संख्याशास्त्र, माझे जीवन' हे संवादात्मक असून, अधिविभागाच्या माजी विद्यार्थ्यांची प्रेरणादायी मुलाखत होईल. तिसऱ्या सत्रात बी.एस्सी. भाग ३ च्या सांख्यिकीशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी 'सार्वजनिक आरोग्यामधील सांख्यिकीय अंतर्दृष्टी' या विषयावर प्रकल्प सादरीकरण स्पर्धा आयोजित केली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 FEB 2025
पुण्यनगरी

# खांडेकर हे जीवनवादी लेखक : ठाकूर

**कोल्हापूर :** खांडेकरांचे साहित्य आदर्श आणि प्रेरक स्वरूपाचे होते. वि. स. खांडेकर हे जीवनवादी लेखक होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक रवींद्र ठाकूर यांनी केले.

ते शिवाजी विद्यापीठातील मराठी विभाग आयोजित डॉ. अनंत आणि डॉ. लता लाभसेटवार प्रन्यास प्रतिष्ठान अमेरिका पुरस्कृत वि. स. खांडेकर जयंती व्याख्यानमालेत 'वि. स. खांडेकर यांचा जीवनवाद' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. सुनीलकुमार लवटे होते. रवींद्र ठाकूर म्हणाले, जीवनाविषयीचे प्रेम खांडेकरांच्या साहित्यातून जाणवते. खांडेकर हे लेखकांचे लेखक होते. त्यांच्या लेखनामुळे अनेकांना लेखनाची प्रेरणा मिळाली. मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. रणधीर शिंदे यांनी करून दिला. सूत्रसंचालन ज्योती वराळे केले. आभार अमोल देशमुख यांनी मानले. डॉ. अनिल गवळी, डॉ. गोमटेश्वर पाटील, डॉ. जयवंत दळवी, संशोधक विद्यार्थी, एम.ए.चे विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 FEB 2025
सकाळ

दृष्टिक्षेपात

## जातीआधारित भेदभाव प्रतिबंध समिती गठित

कोल्हापूर : विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) सूचनेनुसार शिवाजी विद्यापीठात जातीआधारित भेदभाव प्रतिबंध समिती गठित करण्यात आली आहे. अनुसूचित जाती, जमाती, इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी, कर्मचारी यांच्या संदर्भात जातीआधारित भेदभाव होत असल्यास अशा तक्रारींचे निवारण करण्यासाठी जातीआधारित भेदभाव प्रतिबंध समितीचे गठन करण्याची सूचना यूजीसीने केली होती. त्याच्या अध्यक्षपदी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागाचे प्रा. डॉ. नितीन कांबळे, सदस्य सचिवपदी उपकुलसचिव विभा अंत्रेडी, तर सदस्यपदी अमरसिंह रजपूत, प्रा. एस. टी. कोंबडे, प्राचार्य डॉ. संजय पाटील, डॉ. किशोर कुच्चे, उर्मिला क्षीरसागर, आनंदराव खामकर, दीपक शिंदे यांचा समावेश आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 FEB 2025
तरुण भारत

# विद्यापीठात जातीआधारित भेदभाव प्रतिबंध समिती गठीत

**कोल्हापूर :** विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी)च्या सुचनेनुसार शिवाजी विद्यापीठाते जातीआधारित भेदभाव प्रतिबंध समिती गठीत केली आहे. अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी, कर्मचारी यांच्यासंदर्भात भेदभाव होत असल्यास त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी ही समिती गठीत केली आहे. शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक डॉ. नितीन कांबळे या समितीचे अध्यक्ष आहेत. तर व्यवस्थापन व अधिसभा सदस्य अमरसिंह रजपूत, अर्थशास्त्र अधिविभागाचे डॉ. एस. टी. कोंबडे, दूधसाखर महाविद्यालयाचे डॉ. संजय पाटील, विद्यापीठातील डॉ. किशोर कुच्चे, सांगलीतील गरवारे कन्या महाविद्यालयाच्या उर्मिला क्षीरसागर, कास्ट्राईब संघटनेचे आनंदराव खामकर, पदवी वितरण विभागाचे दिपक शिंदे, विशेष कक्षाचे उपकुलसचिव विभा अंत्रेडी यांची सदस्यपदी नियुक्ती केली आहे.